## ' मित्र-मेळावा '



या मित्रांनो, या रे या !
लवकर भर भर ई-मेल द्या !
मजा करा रे ! मजा करा
एक दिवस, तुमचा समजा.
स्वस्थ बसे
तोचि फासे;
पुन्हा गरवारे !
दाविन मी,
रुटीन आपले टाकुनी या
सुंदर बालपणीची दुनिया.
या मित्रांनो ! या रे या !
लवकर भर भर सारे या !
मधुर मंजुळ गाती मुले,
आनंद चोही कडे फुले.
रविवारच्या दिवसी मग,
मैदानावर, मुले च मुले.
आठवणी त्या
सहलीच्या,
स्नेह-संमेलन
गणेशाच्या,
तर मग कामे टाकुनिया
पुन्हा बघाया ती दुनिया !
या मित्रांनो, या रे या !
लवकर भर भर, सारे या !

सुंदर पालवी झाडांना,
गुलमोहर नी माडांना,
मैत्री आपली मोलाची
कधी ना आपण तोलाईची.
विनय
वनिता
आणि
विद्या !
तर मग लवकर धावुनिया
बालपणीची ती दुनिया !

या मित्रांनो, या रे या !

लवकर भर भर, सारे या !

- सुरेश

(डॉ. सु. गि. जोशी, फिलाडेल्फिया, ५ ऑक्टोबर २०१८)

('मित्र-मेळावा' च्या निमित्ताने *बालकवी-स्फुर्तीत)

***